दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com संपादक : अजय भांगे https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | बुधवार दि.१९ नोव्हेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ८९ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Wednesday 19 Nov 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 89 | Pages 4 | Rate 4 Rs

### शिवरायांचा पुतळा अनावरणावरून संघर्ष वाढला

**मुंबई–** नवी मुंबईतील नेरूळ परिसरात उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुन्हा एकदा कपडा घालण्यात आल्याने राजकीय वातावरण तापले आहे. जवळपास सहा महिन्यांपासून महानगरपालिकेने या पुतळ्याचे अधिकृत अनावरण केले नव्हते. मात्र, मनसे नेते अमित ठाकरे यांनी रविवारी अचानक पुतळ्याचे अनावरण करत महापालिकेच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या अनावरणादरम्यान पोलिस आणि मनसे कार्यकर्त्यांमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाली. त्यानंतर नेरूळ पोलिस ठाण्यात अमित ठाकरे आणि ७० मनसैनिकांवर गुन्हे दाखल करण्यात आले. प्रकरण चिघळू नये म्हणून प्रशासनाने पुतळा पुन्हा कपड्याने झाकून ठेवला.मनसेकडून मात्र या कृतीवर तीव्र प्रतिक्रिया देण्यात आली आहे. मनसेचे प्रवक्ते गजानन काळे यांनी पालिकेवर थेट हल्ला चढवत, छत्रपतींना पुन्हा बंदीस्त करून पालिकेने हे सरकार मोगलाई कारभार करत असल्याचे सिद्ध केले, असा आरोप केला. त्यांनी पुढील काळात गनिमी कावा पद्धतीने पुन्हा एकदा अनावरण करण्याचा इशाराही दिला. मनसेच्या भूमिकेनुसार, महाराजांचा पुतळा जनसामान्यांसाठी खुला ठेवला गेला पाहिजे.

# मनसे नेते अमित ठाकरे यांच्यावर राजकीय प्रवासातील पहिला गुन्हा:नेरूळमध्ये परवानगीशिवाय शिवरायांच्या पुतळ्याचे अनावरण

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई (वृत्तसंस्था)**

नवी मुंबईतील नेरूळ परिसरात चार महिन्यांपासून झाकून ठेवलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे मनसेचे नेते अमित ठाकरे यांनी परवानगी न घेता अनावरण केल्यानंतर या प्रकरणाने मोठा राजकीय रंग घेतला आहे. स्थानिक पोलिसांनी या घटनेची नोंद घेत अमित ठाकरे आणि त्यांच्या सोबत उपस्थित असलेल्या सुमारे ७० मनसैनिकांवर गुन्हा दाखल केला आहे. विशेष म्हणजे, अमित ठाकरे यांच्या राजकीय प्रवासातील हा पहिलाच गुन्हा असून त्यामुळे या कारवाईकडे राज्यभरातून लक्ष लागले आहे.नेरूळमधील राजीव गांधी उड्डाणपुलाजवळ उभारलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा गेल्या चार महिन्यांपासून अनावरणाशिवाय तसाच कापडाने झाकलेला होता. नागरिकांकडून या संदर्भात तक्रारी येत असतानाही अधिकृत अनावरणासाठी कोणत्याही मंत्री किंवा पदाधिकाऱ्याला वेळ न मिळाल्याचा स्थानिकांचा आरोप होता. ही बाब अमित ठाकरेंना कळताच त्यांनी कोणतीही परवानगी न घेता मनसैनिकांच्या उपस्थितीत पुतळ्यावरील कापड हटवून अनावरण पूर्ण केले. या वेळी पोलिसांनी त्यांना थांबवण्याचा प्रयत्न केल्याने दोन्ही बाजूंमध्ये ढकलाढकलीही झाली.अमित ठाकरे यांनी केलेले अनावरण हा अचानक घेतलेला निर्णय नसल्याचे त्यांच्या भाषणातून दिसून आले. ते कौपरखैरणे येथे मनसे शाखेच्या उद्घाटनासाठी आले असताना काही कार्यकर्त्यांनी पुतळा धूळ खात पडल्याची माहिती दिली. त्यांनी तात्काळ त्या ठिकाणी जाऊन परिस्थिती पाहिली आणि चार महिने पुतळा झाकून का ठेवला आहे, याबाबत प्रश्न उपस्थित केला. महाराजांची मूर्ती लोकांच्या मागणीनुसार उभारली. पण चार महिने कोणीच अनावरणासाठी आला नाही. इतक्या काळ पुतळ्यावर धूळ साचत आहे, हे बघवेना म्हणून अनावरण केलं, असे ठाकरे म्हणाले.या प्रसंगी त्यांनी सरकारवर जोरदार टीका करत राज्यातील प्रमुख नेते आणि मंत्र्यांनी नवी मुंबईत अनेक कार्यक्रमांसाठी हजेरी लावली तरी छत्रपती शिवाजी महाराजांबाबत मात्र दुर्लक्ष झाले, असा आरोप केला. पंतप्रधानांपासून मुख्यमंत्री–उपमुख्यमंत्री सगळेच इथे आले. पण आपल्या आराध्य दैवतांच्या पुतळ्याला कापडात ठेवून देतात, हे नवी मुंबईतील लोकांना मान्य नव्हतं, असे ते म्हणाले. अनावरण करताना मनसे कार्यकर्त्यांनीही घोषणाबाजी करत या दुर्लक्षाचा निषेध व्यक्त केला.



### माझ्या आयुष्यातील पहिली केस–अमित ठाकरे

**या सर्व प्रकाराचा व्हिडिओ आणि माहिती सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाल्यानंतर पोलिसांनी कारवाईची पावले उचलली. परवानगीशिवाय केलेल्या सार्वजनिक कार्यक्रमामुळे पोलिस अधिनियम आणि संबंधित कलमांनुसार गुन्ह्याची नोंद करण्यात आली. या संदर्भात प्रतिक्रिया देताना अमित ठाकरे यांनी, ही माझ्या आयुष्यातील पहिली केस असेल तर त्याचा आम्हाला अभिमानच आहे. महाराजांसाठी शेकडो केसेस लागल्या तरी त्याची आम्ही पर्वा करणार नाही, असा ठाम पवित्रा घेतला. या घटनेनंतर मनसे कार्यकर्त्यांचा उत्साह वाढल्याचे पाहायला मिळत असून पुढील काही दिवसांत हा मुद्दा आणखी तापण्याची चिन्हे आहेत.**

### अखेर निष्ठावान कार्यकर्त्याला मिळाला न्याय!
# युवराज मगर यांची पदवीधर केज तालुकाध्यक्षपदी निवड

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात मागील दहा वर्षांपासून सातत्याने आणि निष्ठेने कार्यरत राहिलेल्या युवराज मगर यांना अखेर त्यांच्या प्रामाणिक कार्याचा योग्य सन्मान मिळाला आहे. बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष खासदार बजरंग सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली मगर यांची पदवीधर केज तालुकाध्यक्षपदी निवड करण्यात आली.



दीर्घकाळापासून संघटनाच्या उभारणीत महत्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या युवराज मगर यांनी केज तालुक्यात मजबूत कार्यकर्त्यांची फळी उभारली आहे. अठरापगड जाती–संघटनांतील नागरिक, दलित बांधव, कष्टकरी, शेतकरी तसेच युवक यांचा मोठा सहभाग त्यांच्या कार्यातून दिसून येतो.या निवडीमुळे केज तालुक्यातील कार्यकर्त्यांमध्ये मोठ्या आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरातून युवराज मगर यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे तालुक्यातील पक्ष संघटन अधिक बळकट होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# केंद्र सरकारने केंद्रीय कर्मचाऱ्यांना ८ वा वेतन आयोग लागू केला तसा शेतकऱ्यांना स्वामीनाथन आयोग लागू करावा-वसुदेव गायकवाड

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केंद्र सरकारने केंद्रीय कर्मचा–यांना ८ वा वेतन आयोग लागू केला आहे. त्याप्रमाणे देशातील सर्व शेतकर्यांसाठी २००६ पासून प्रलंबित असलेला स्वामीनाथन आयोग लागू करावा अशी मागणी आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण,आनंदगांव ता. केज जि.बीडचे संस्थापक कार्यवाह तथा जेष्ठ समाजसेवक डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केंद्र शासनाकडे केली आहे.केंद्रीय कर्मचाऱ्यांना रोज १५०० रुपये मिळत असताना देशातील शेतकर्यांनाही १०००, १२०० रुपये रोज मिळावेत अशी मागणी डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केली आहे.एमएसपीसी नुसार शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव,बाजारभाव मिळणे आवश्यक आहे.

बि –बियाणे,खते, किटकनाशके यांच्या वाढलेल्या किंमती पहाता आणि शेतकर्याने पोटच्या लेकराप्रमाणे पोसलेल्या, जोपासलेल्या पिकांच्या किंमत मात्र वाढत नाहीत.

शेतकर्यांच्या शेतीच्या मशागतीचा खर्च वाढतोय पण उत्पन्न वाढत नाही म्हणून देशाचा पोशिंदा असलेला बळीराजा शेतकरी कर्जबाजारी होतोय.आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचलतोय याची किमान जाणीव ठेवून तरी केंद्र शासनाने स्वामीनाथन आयोग लागू करून



शेतीमालाला हमी भाव द्यावा अशी मागणी डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी

केली आहे.केंद्रीय कर्मचारीही माणूसच आहे आणि शेतकरीही माणूसच आहे मग हा भेदभाव का?असा प्रश्न आहे.केंद्र शासनाने शेतकर्यांच्या लेकरांनाही शिक्षण घेता यावे,उच्च शिक्षित होता यावे, शेतकऱ्यांच्या लेकरांची लग्न व्हावीत,त्यांचाही सुखाचा संसार व्हावा म्हणून तरी २००६ पासून प्रलंबित असलेला स्वामीनाथन आयोग शेतकर्यांसाठी लागू करावा व शेतमालाला हमीभाव बाजारभाव मिळावा अशी मागणी आनंद ग्रामिण विकास प्रतिष्ठाण,आनंदगांव ता. केज जि.बीडचे संस्थापक कार्यवाह,जेष्ठ समाज सेवक डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी केंद्र शासनाकडे केली आहे.

# जयपूरीया मंदिरात ध्यान कार्यक्रम संपन्न; भारतीय मजदुर संघाचे राष्ट्रीय महामंत्री चरणसिंहजी यांची उपस्थिती

**दैनिक वादळ वार्ता**
**मुंबई । प्रतिनिधी**

दिनांक १६ नोव्हेंबर २०२५ रोजी जयपूरिया मधील मंदिरात आयोजित ध्यान कार्यक्रमाला भारतीय जनता मजदूर संघाचे राष्ट्रीय महामंत्री व दिल्ली प्रदेश प्रभारी चौधरी चरणसिंहजी यांनी उपस्थिती लावून या कार्यक्रमाची शोभा वाढवली.हा कार्यक्रम भारतीय जनता मजदूर संघाच्या आरोग्य चिंतन व शक्तिकरण मंडळाच्या दिल्ली प्रदेश प्रभारी सुश्री छत्रवती यांच्या मार्गदर्शना खाली यशस्वीपणे पार पडला.



ध्यान सत्रानंतर आपल्या मनोगतात चौधरी चरणसिंह जी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सुश्री छत्रवती व सर्व आयोजकांचे अभिनंदन केले.तसेच उपस्थित श्रध्दावानांचे त्यांनी मनःपूर्वक आभार मानले. भारतीय जनता मजदूर संघाच्या कार्याची वाढती पावले अधोरेखित करत महाराष्ट्र राज्याच्या वतीने राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके यांनी राष्ट्रीय महामंत्री चरणसिंग जी यांना हार्दिक शुभेच्छा देऊन अभिनंदन केले आहे.ध्यान,आरोग्य व संघटन बांधणी यांच्या माध्यमा तून संघाच्या बळकटी करणासाठी असे उपक्रम प्रेरणादायी असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले.

# आपल्या वर्तनातून मुल्य प्रवाहित होतात-डॉ.योगेश सुरवसे

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील साने गुरुजी निवासी विद्यालयात जिल्हाशिक्षण व प्रशिक्षण संस्था अंबाजोगाई यांच्या वतीने मुल्यवर्धित ३.० च्या दुसऱ्या टप्प्याचे उद्घाटन संपन्न झाले.या उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर उद्घाटक म्हणून बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळाचे अध्यक्ष अँड.उद्धवराव कराड, प्रमुख अतिथी म्हणून वरिष्ठ अधिव्याख्याता श्री. देशमुख सर,जयपाल कांबळे सर,मुथा फाउंडेशनचे सचिन सर, गर्जे सर,प्रा.डॉ.कविता कराड मॅडम आदि मान्यवर उपस्थित होते. दुसऱ्या टप्प्याच्या अध्यक्षस्थानावरून श्री. सुरवसे सर बोलताना म्हणाले की,मुलांमध्ये मुल्य ही उपजतच असतात त्यांना वर्धित करण्याच काम आपलं आहे.मुल्य ही प्रत्येकाच्या वर्तनातून प्रवाहित झाली पाहिजेत.प्राचीन काळा पासून मुल्य




शिक्षण दिले जाते.यात नैतिक मूल्ये सामाजिक मुल्य अशा विविध मुल्ये ही विद्यार्थ्यांच्या वर्तनातून प्रवाहित झाल्यासच ख–या अर्थाने मुल्यवर्धन झाले असे म्हणता येईल. अन्यथा दुटप्पी पद्धतीचे शिक्षण होईल असे मत त्यांनी व्यक्त केले.भुदान चळवळीत विनोबा भावे यांनी हजारो हेक्टरजमीन दान दिली हे एक नैतिक मुल्यच होय असे मत त्यांनी व्यक्त केले तर उद्घाटन प्रसंगी अँड. उद्धवराव कराड यांनी विविध उदाहरणे देऊन मुल्यांच्या संवर्धना बरोबर मुल्यवर्धन होणे काळाची गरज आहे असे मत व्यक्त केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुथा फाउंडेशनचे सचिन सर यांनी देखील उपस्थित सर्वांना मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणाचे प्रमुख जयस्वाल कांबळे सर यांच्या उत्कृष्ट नियोजनाचे कौतुक ही या प्रसंगी करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन अरुण शिंदे सर यांनी केले तर आभार प्रा.डॉ.कविता कराड–गित्ते मॅडम यांनी केले.

# महाराष्ट्र विद्यालय बनसारोळा शाळेच्या विद्यार्थिनी आंतरराष्ट्रीय स्तरावर जंपरोप स्पर्धेत भारतीय संघात देशाचे नेतृत्व करणार




**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

नुकत्याच पार पडलेल्या रीवा,मध्यप्रदेश येथे झालेल्या २२ व्याज्युनियर राष्ट्रीय जंपरोप स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघात महाराष्ट्र विद्यालय बनसारोळा येथील खेळाडूंनी सिंगल रोप स्पीड रिले सांघिक प्रकारात वैभवी बालासाहेब सोनके, मुक्ताई अण्णासाहेब पारेकर,पल्लवी अमिताभ गोरे यांनी कांस्यपदक पटकावले आहे.


तसेच चीन किंवा थायलंड या देशात होणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.त्यांच्या या यशाबद्दल बनेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.नरेंद्र काळे सर,अध्यक्ष श्री.भागवत दादा गोरे तसेच संचालक मंडळ तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री.काकडे आर.एम सर तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी मार्गदर्शक श्री.मनेश गोरे सर व विद्यार्थ्यांचे कौतुक केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.या यशा बद्दल पंचक्रोशीतील सर्वांकडून शुभेच्छा व कौतुकांचा वर्षाव होत आहे.

# केज तालुक्यातील तलाठी कार्यालयात तलाठीच उपलब्ध नाहीत,बंद कार्यालयामुळे शेतकरी हैराण

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील आणि तालुक्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालले असताना प्रशासनातील बेफिकिरी मात्र काही केल्या कमी होताना दिसत नाही.एका इमारतीत तब्बल चार पाच तलाठी कार्यालये कार्यरत असतानाही, वेळेवर एकाही तलाठी किंवा कर्मचाऱ्यांची उपस्थिती दिसत नाही. शिंदी सज्जा,बोरगाव सज्जा तसेच इतरही सर्व काही सज्जांमध्ये हीच परिस्थिती वारंवार पाहायला मिळत आहे. त्यामुळे आधीच पावसाने होरपळून गेलेल्या आणि आर्थिक संकटाला सामोरे जाणाऱ्या शेतकऱ्यांचे हाल अधिकच वाढले आहेत.अलीकडेच पावसा मुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाले. शेतकरी अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत.सरकार कडून अनुदान वितरणाची प्रक्रिया सुरू असली तरी प्रत्यक्षात अनेकांनाअद्याप एक रुपयांचे सुद्धा अनुदान मिळालेले नाही. याचबरोबर केवायसी पडताळणीच्या याद्या सुरु आहेत,परंतु कर्मचारी गैरहजेरीमुळे हा प्रक्रियेचा वेग अक्षरशः ठप्प झाला आहे.केज येथील तलाठी कार्यालयाचे दरवाजे बहुतेक दिवशी लॉक अवस्थेत दिसत असल्याने नागरिकांना वारंवार हुलकावणी मिळत आहे.

ग्रामीण भागातील लोकांना महत्त्वाच्या कागदपत्रांसाठी ७/१२, फेरफार,पीक नोंदणी, अनुदान प्रस्ताव यासाठी तलाठी कार्यालयावर दैनंदिन अवलंबून राहावे लागते.परंतु कर्मचारी वेळेवर उपस्थित रहात नसल्याने अनेकांना दिवसभर प्रतीक्षा करून ही काम न होता परतावे लागत आहे.शेतकरी स्वतःचे काम सोडून, प्रवास करून कार्यालयात येतात; पण कार्यालय



बंद असल्याचे चित्र सातत्याने समोर येत आहे.यामुळे त्यांच्या मनात प्रचंड नाराजी निर्माण झाली आहे.या सर्व प्रकारामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लक्ष नेमके कुठे आहे? हा प्रश्न अधिक गंभीरपणे उपस्थित होत आहे. प्रशासनाच्या अशा निष्क्रियतेकडे दुर्लक्ष करत राहिले,तर केज तालुक्यातील शेतकऱ्यांच्या समस्या अधिकच बळावणार आहेत.अनुदानाच्या निधीची प्रतिक्षा करणारे शेतकरी,आधीच नैसर्गिक आपत्तीने त्रस्त असताना, आता प्रशासनाच्या दुर्लक्षा मुळे दुप्पट अडचणीत सापडत आहेत.याच संबंधी नागरिकांनी आणि शेतकऱ्यांनी घेतलेले अँगल कमेऱ्याचे फोटो देखील या परिस्थितीचे वस्तुचित्र स्पष्ट दाखवतात.कार्यालय बंद, कर्मचारी अनुपस्थित, आणि नागरिक दररोज च्या गैरसोईला कंटाळलेले आहेत अशीच अवस्था सध्या पाहायला मिळत आहे.जनतेच्या सोयीसाठी असलेली ही कार्यालये प्रत्यक्षात जनतेलाच त्रास देत असतील,तर या विरोधात ठोस पावले उचलण्याची वेळ आता आली आहे.संबंधित विभागाने तातडीने लक्ष देऊन जबाबदारी निश्चित करणे अत्यावश्यक आहे.

## संपादकीय

# न्यायाची ऐशीतैशी

बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना ढाक्यातील आंतरराष्ट्रीय गुन्हे न्यायाधीकरणाने फाशीची सोमवारी शिक्षा सुनावली. हे अपेक्षितच होते. त्यात धक्कादायक असे काहीही नाही. शेख हसीना यांची बांगलादेश न्यायालयाने निर्दोष सुटका केली असती, तर कदाचित ते जगातील आठवे आश्चर्य गणले गेले असते. शेख हसीना यांच्या निकालाला फेब्रुवारी २०२६ मध्ये होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणुकांची पार्श्वभूमीही आहे. शेख हसीना यांनी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीत्या निवडणूक लढवू नये, तसेच त्यांच्या अवामी लीग या पक्षाने निवडणूक प्रक्रियेत सहभागी होऊ नये, यासाठीच बांगलादेश सरकारने या निकालाबाबत घाई केली असणार. बांगलादेशमधील न्यायालये पूर्णपणे सरकारच्या अधीन असून सरकारला अपेक्षित असलेला निकालच न्यायालयाच्या माध्यमातून दिला जातो, हे शेख हसिना यांना दिल्या गेलेल्या शिक्षा प्रकरणातून स्पष्ट झाले आहे. मुळात शेख हसीना यांच्यावर गुन्हा दाखल करणे, आरोप निश्चिती करणे, खटला चालविणे, शिक्षा सुनावणे हा सर्वच प्रकार संशयास्पद असून पूर्वनियोजित आहे. शेख हसीना यांना मानणारा एक मोठा वर्ग आजही बांगलादेशमध्ये आहे. त्यामुळे निकाल देण्यापूर्वी दोन दिवस अगोदरपासून बांगलादेशमध्ये सर्वत्र कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता. सगळीकडे कर्फ्यूसारखे वातावरण होते. हा एकतर्फी निकाल दिला गेल्याने त्याचे पडसाद उमटणे स्वाभाविकच होते.हसीना यांच्या बंदी घातलेल्या अवामी लीग या पक्षाने त्यांना सुनावण्यात आलेल्या मृत्युदंडाच्या निषेधार्थ मंगळवारी देशव्यापी बंदची हाक दिली आहे. या पक्षाने या निकालाला स्वीकारण्यास पूर्णपणे नकार दिला आहे. अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस आणि मंत्र्यांनी तत्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी शेख यांच्या समर्थकांकडून करण्यात येत आहे. पक्षाच्या फेसबुक पेजवर एक व्हिडीओ प्रसिद्ध करून हा निर्णय पक्षपाती आणि राजकीय सूडबुद्धीने घेतल्याचे म्हटले आहे. १४ ऑगस्ट रोजी खटला सुरू झाला आणि १७ नोव्हेंबर रोजी निकाल देण्यात आला. न्यायालयाने दोन महिन्यांच्या कालावधीत फक्त २० दिवस या खटल्याची सुनावणी केली. खटल्यात ८४ साक्षीदारांपैकी फक्त ५४ साक्षीदारांच्या साक्षी झाल्या. सरन्यायाधीश महिनाभर अनुपस्थित होते, तरीही निकाल देण्यात आला. जगाच्या इतिहासात डोकावून पाहिल्यास, शेख हसीना यांच्या आधीही अनेक नेत्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. सत्तेसाठी संघर्ष, उठाव आणि लष्करी बंडाळीमुळे अनेक नेत्यांना फासावर लटकवण्यात आले. कधी हे निर्णय कायदेशीर प्रक्रियेतून झाले, तर कधी लष्करी राजवटीने किंवा सत्ता काबीज करणाऱ्यांनी हे निर्णय लादले. अशा प्रमुख नेत्यांमध्ये सद्दाम हुसेन ते झुल्फिकार अली भुट्टो अशा अनेक नावांचा समावेश आहे. प्रस्थापित नेतृत्वाची हकालपट्टी होणे अथवा त्यांची सत्ता घालविणे, त्यांच्यावर देशातून परांगदा होण्याची वेळ येणे अशी परिस्थिती ज्या ज्या वेळी उद्भवते, त्या त्या वेळी संबंधित देशामध्ये नव्याने सत्तेवर आलेल्या राजवटीने पूर्वीच्या प्रस्थापितांना फासावर लटकवण्याच्या घटना अनेक देशांमध्ये घडल्या आहेत, कदाचित यापुढेही घडत राहतील. गेल्या वर्षी १५ जुलै ते १५ ऑगस्ट दरम्यान विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखाली शेख हसीना यांच्या सरकारच्या विरोधात निदर्शने करण्यात आली. या निदर्शनामध्ये विद्यार्थ्यांचा वाढता प्रक्षोभ, संताप, आंदोलनाची वाढती दाहकता पाहिल्यावर शेख हसीना यांनी सत्ता सोडून भारतात पलायन केले. त्यात जवळपास १४०० लोकांचा मृत्यू झाला. या आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या अत्याचार व त्यातून घडलेले मृत्यू या सर्वांना बांगलादेशच्या न्यायालयाने शेख हसीना यांना जबाबदार धरत त्यांना चिथावणी देणे व हत्येचे आदेश देणे या आरोपाखाली मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली. अन्य चार प्रकरणांमध्ये जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावली असली तरी त्यांना तत्काळ फाशी दिली जाईल, असे नाही. त्यासाठी बराच कालावधी जाईल. भारत सरकारची भूमिकादेखील या प्रकरणात निर्णायक ठरणार आहे. भारत सरकार शेख हसीना यांना बांगलादेशच्या स्वाधीन करण्याची शक्यता कमीच आहे. या फाशीच्या घटनेचे जागतिक पातळीवरही पडसाद उमटण्याचीही शक्यता आहे. विशेष म्हणजे बांगलादेशातील विशेष खटले चालविण्यासाठी काही वर्षांपूर्वी शेख हसीना यांनी ज्या न्यायालयाची स्थापना केली होती, त्याच न्यायालयाने हसीना यांना मृत्युदंडाची शिक्षा ठोठावली आहे! १९७१ च्या बांगलादेश मुक्ती युद्धादरम्यान झालेल्या युद्ध गुन्ह्यांची आणि नरसंहाराची चौकशी करण्यासाठी आणि त्यांच्यावर खटला चालवण्यासाठी २०१० मध्ये या न्यायालयाची स्थापना करण्यात आली. १९७३ मध्ये न्यायाधीकरण स्थापन करण्यासाठी कायदा मंजूर झाला असला तरी, ही प्रक्रिया अनेक दशके रखडली होती.हसीना यांनी २०१० मध्ये गुन्हेगारांवर खटला चालवण्यासाठी त्याची स्थापना केली. बांगलादेश आणि पाकिस्तान या शेजारील राष्ट्राची निर्मिती भारतातूनच झालेली आहे. १४ ऑगस्ट १९४७ रोजी भारत आणि पाकिस्तान या दोन राष्ट्राची निर्मिती झाली. त्यानंतर १९७१ साली बांगलादेशची निर्मिती झाली आहे. १९४७ ला स्वतंत्र झाल्यापासून ७८ वर्षांच्या कालावधीत भारतामध्ये सत्तेसाठी हिंसाचार, नेतृत्वाचे पलायन, शेजारील देशांमध्ये आश्रय, अराजकता, यादवी अशा घटना कधीही घडल्या नाहीत. यापुढेही घडण्याची शक्यता नाही. उलटपक्षी पाकिस्तान व बांगलादेशात ठरावीक कालावधीनंतर अशा घटना घडतच असतात. भारताने स्वीकारलेल्या लोकशाहीमुळे भारतात एकीकडे शांतता नांदत असतानाच शेजारील आपल्या पाकिस्तान व बांगलादेशामध्ये सातत्याने यादवीसदृश वातावरण निर्माण होत असते. आजचा सत्ताधारी उद्या तेथे कारागृहातील कैदी दिसला, तरी त्या राष्ट्रातील नागरिकांना फारसे आश्चर्य वाटत नाही. पाकिस्तानात तर अनेक सत्ताधीशांचा अंत व सत्तेची अखेर यादवीपर्वातच झाली आहे. बांगलादेशातील घटनेपासून भारताने सतर्क होत सावधगिरी बाळगली पाहिजे. कारण शेजाऱ्याचे जळके घर आपल्यासाठीदेखील नेहमीच हानिकारक असते. शेख हसीना यांनी भारतात आश्रय घेतल्याने त्यांच्या सुरक्षिततेची जबाबदारी पूर्णपणे भारताचीच आहे. भारतात आजही लाखोंच्या संख्येने बांगलादेशी अनधिकृतरीत्या वास्तव्य करत असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे कोणा माथेफिरू बांगलादेशीने हसीना यांच्या जीविताचे काही भलेबुरे करू नये याचीही काळजी भारतालाच घ्यावी लागणार आहे.

# मृत्यू इथले संपत नाही

पुणे शहरातील वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला पुणे–बंगळूरु महामार्गावरील नवले पुलाचा परिसर गेली अनेक वर्षे अपघातांसाठी 'कुख्यात' ठरत आहे. वाढते वाहनभार, रस्त्याची रचना, मोठ्या उताराचा ढलान आणि अवजड वाहनांचे नियंत्रण सुटणे या गोष्टींच्या संगमामुळे या ठिकाणी अपघातांची मालिका अखंड सुरू आहे. त्यामुळे मृत्यू इथले संपत नाहीत असेच म्हणावे लागेल.



नवले पूल परिसरात घडलेले अपघात हे एक–दोन घटनांपुरते मर्यादित नाहीत. गेल्या काही वर्षांमध्ये शेकडो अपघातांची नोंद झाली असून यांपैकी अनेक अपघात गंभीर स्वरूपाचे ठरले आहेत. काही घटनांमध्ये अवजड वाहनांनी ब्रेक फेल झाल्याने गतीवर नियंत्रण सुटून अनेक वाहने चेंगरली गेली, तर काही अपघातांमध्ये दुचाकीस्वार, पादचारी आणि खासगी वाहनचालकांचे प्राण गेले. नुकताच एक अपघात झाला त्यात ८ जणांना जीव गमवावा लागला, तर २२ जण गंभीररीत्या जखमी झाले. या अपघाताच्यानिमित्ताने नवले पुलाची असुरक्षितता पुन्हा चर्चेत आली. त्यामुळे 'मृत्यू इथले संपत नाहीत' असेच म्हणावे लागेल. नवले पुलावर अपघात झाल्यावर नुसतीच उपाययोजनांची चर्चा होते, पण त्यावर कृती शून्य असते. गेल्या आठ वर्षांत नवले पूल परिसरात २१० पेक्षा अधिक अपघात झाले आहेत. यामध्ये ८२ पेक्षा अधिक निष्पाप लोकांचे बळी गेले आहेत. यामध्ये प्रवाशांसह काही स्थानिक नागरिकांचाही समावेश आहे. आणखी किती निष्पापांचे बळी घेणार आहात? असा संतप्त सवाल स्थानिक नागरिक करताना दिसतात. नवले पुलावरील वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने तात्पुरत्या उपाययोजना केल्या आहेत. मात्र, ठोस उपाययोजना नसल्याने स्थानिक संतप्त झाले आहेत. या होणाऱ्या अपघातांना जबाबदार कोण? असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

वडगाव बुद्रुक, नऱ्हे गावाच्या हद्दीतून मुंबई–बंगळूरु राष्ट्रीय महामार्गाचा रस्ता जांभूळवाडी बोगद्यामार्गे जातो. आतापर्यंत ८२ पेक्षा अधिक लोकांचे बळी नवले पूल, कात्रज रस्ता, नऱ्हे येथील महामार्गावर गेले आहेत. रस्त्याचा तीव्र उतार आणि त्या उतारावरून खाली येताना वाहनांचे वेग आपोआप वाढतात आणि जर चालकाने काळजी घेतली नाही तर वाहनावरचे नियंत्रण सहज सुटू शकते. या भागात अनेक अवजड वाहने विशेषत: कंटेनर, ट्रक, टेलर नियमितपणे ये–जा करतात. या वाहनांमध्ये यांत्रिक बिघाड किंवा ब्रेकची क्षमता कमी असल्यास अपघाताची शक्यता वाढते. अनेकदा जड वाहनांचे चालक उतारावर येताना इंजिन बंद करणे किंवा न्यूट्रल गिअरमध्ये वाहन चालवणे पसंत करतात, ज्यामुळे वेग अनियंत्रित वाढतो. तसेच काही चालक सतत डावीकडे राहण्याचा नियम पाळत नाहीत, अचानक लेन बदलतात किंवा सिग्नलचे पालन करत नाहीत. वाहनचालकांची बेपर्वाई कारणीभूत ठरते. रस्त्याची रचना देखील समस्या वाढवणारी आहे. उतारानंतर अचानक वळण येते आणि पुढे एक महत्त्वाचा सिग्नल लागतो. त्यामुळे उतारावर वेग जास्त झाल्यास पुढे वाहन थांबवणे कठीण होते. वाहतूक कोंडी, रस्त्याची दुरुस्ती, अपुरा प्रकाश, संकेत फलकांचा अभाव किंवा चुकीची बांधणी हेही घटक अपघातास कारणीभूत ठरतात, अशी काही कारणे आहेत, की ज्यामुळे अपघातात वाढ होताना दिसत आहे. कात्रज नवीन बोगदा ते नवले पुलादरम्यान ८ कि. मी. रस्त्यावर उतार आहे. हा उतार आय. आर.सी.च्या मानकाप्रमाणे योग्य आहे. इंधन वाचविण्यासाठी वाहने न्यूट्रल करून चालवतात व त्या भागांत सतत ब्रेकचा वापर केल्यामुळे ब्रेक निकामी होतात. त्यामुळे नियंत्रण सुटून अपघात होतात, असे एनएचएआयने म्हटले आहे.

गेल्या २५ वर्षांपासून शेकडो लोकांचे बळी नवले पूल, कात्रज रस्ता आणि नऱ्हे येथील महामार्गावर झालेले आहेत. गेल्या काही महिन्यांपासून या परिसरात मोठ्या प्रमाणात अपघात होत आहेत. यामुळे निष्पापांचे बळी जात आहेत. सध्या रोज नवले पुलाखाली वाहतूक कोंडी होत असून याठिकाणी एक भुयारी मार्ग करणे गरजेचे असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. अपघात वाढल्यानंतर प्रशासनाने काही उपाययोजना जाहीर केल्या आहेत. उतारावर वेगमर्यादा दर्शवणारे फलक लावणे, रस्त्याचे पुनर्बांधणी करणे, अतिरिक्त सिग्नल बसवणे, पोलीस गस्त वाढवणे अशी पावले उचलण्यात आली. काही वेळा विशेष मोहिमेद्वारे अवजड वाहनांची तपासणी करण्यात आली. ब्रेक तपासणी, फिटनेस तपासणी आणि वाहतूक नियमभंगावरील कारवाईतही वाढ करण्यात आली आहे. पण, प्रशासनाची उपाययोजना बहुतेकदा तात्पुरती आणि अपुरी असते. अपघात झाल्यावर काही दिवस गदारोळ होतो आणि नंतर परिस्थिती पूर्ववत होते. त्यामुळे या मार्गावरील कायमस्वरूपी रस्त्याचे डिझाइन बदलणे, उतार कमी करणे, स्वतंत्र अवजड वाहन मार्ग तयार करणे अशा दीर्घकालीन उपायांची गरज आहे. नवले पुलावर होणारे अपघात रोखण्यासाठी दीर्घकालीन नियोजन करणे गरजेचे आहे. जसे की, रस्त्याच्या उताराचे पुनर्मूल्यांकन आणि सुधारणा, रस्त्याचा उतार कमी करणे किंवा त्यास सुरक्षित स्वरूप देण्यासाठी तांत्रिक बदल आवश्यक आहेत. अवजड वाहनांसाठी वेगळा मार्ग असणे आवश्यक आहे. उतारावरून येणाऱ्या जड वाहनांसाठी स्वतंत्र लेन किंवा स्वतंत्र मार्ग तयार केल्यास सुरक्षितता वाढण्यास मदत होईल. ट्रक, कंटेनर यांची निरंतर तांत्रिक तपासणी गरजेची आहे. कठोर वाहतूक नियमांची अंमलबजावणी महत्त्वाची आहे.

नवले पूल परिसरात वारंवार घडणाऱ्या अपघातांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत असताना प्रशासन ठोस उपाययोजना करण्याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला. इथे सर्वसामान्य माणसाच्या जीवाची काहीच किंमत नाही का? अजून किती निष्पाप लोकांचे जीव घेणार आहात? मरण एवढे स्वस्त झाले आहे का? असे संतप्त सवाल पुणेकर करत आहेत. नवले पूल परिसरात सातत्याने अपघात होतात; परंतु अपघात झाल्यानंतर प्रशासन जागे होते. चर्चा, बैठका होतात अन् त्यानंतर पुन्हा काहीच होत नाही. प्रवासी नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी. त्याबरोबरीने प्रशासनाच्या डोळ्यांत अंजन घालण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांच्या वतीने महामार्गावर 'सावधान, पुढे नवले पूल आहे' अशा आशयाचे फलक लावले. मात्र, तात्पुरत्या उपाययोजना सोडता प्रशासनाने कुठल्याच ठोस उपाययोजना केल्या नाहीत. नवले पूल हा केवळ पुण्यातील एक वाहतुकीचा बिंदू नाही, तर गेल्या काही वर्षांतील अनेक दुर्घटनांचा केंद्रबिंदू ठरला आहे. वारंवार होणाऱ्या अपघातांनी पुन्हा पुन्हा सावधगिरीची घंटा वाजवली आहे. त्यामुळे यापुढील अपघात टाळण्यासाठी प्रशासन, नागरिक आणि वाहनचालक यांनी एकत्रितपणे पावले उचलणे अत्यावश्यक आहे. सुरक्षितता ही केवळ कागदी घोषणा न राहता प्रत्यक्षात लागू झाल्यावरच नवले पूल परिसर भविष्यातील अपघातांच्या सावटातून मुक्त होईल.

# डीपफेक आणि एआयवर आधारित गुन्हे : वाढता धोका आणि संरक्षण

गेल्या काही वर्षांपासून कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल) आणि विशेषत: डीपफेक तंत्रज्ञानाने आपल्या जीवनात क्रांती घडवून आणली आहे. एका बाजूला एआयमुळे आरोग्य, शिक्षण, उद्योग अशा अनेक क्षेत्रांत नवनवीन संधी निर्माण होत आहेत, तर दुसऱ्या बाजूला याच तंत्रज्ञानाचा गैरवापर करून सायबर गुन्ह्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. डीपफेक आणि एआय आधारित गुन्हे हे आजच्या डिजिटल युगातील एक मोठे आव्हान बनले आहे.



डीपफेक हा शब्द 'डीप लर्निंग' आणि 'फेक' या दोन शब्दांपासून तयार झाला आहे. हे एक प्रकारचे सिंथेटिक मीडिया आहे. याचे कार्य लक्षात घेतले असता, डीपफेक तंत्रज्ञान 'जनरेटिव्ह डव्हर्सेरियल नेटवर्क्स' नावाच्या एआयचा वापर करते. याच्या मदतीने एखाद्या व्यक्तीचे फोटो, व्हिडीओ आणि आवाजाचे नमुने घेऊन त्याची हुबेहूब बनावट; परंतु अत्यंत वास्तववादी प्रतिमा, व्हिडीओ किंवा ऑडिओ तयार केले जातात. आपण अनेकदा राजकीय नेत्यांची भाषणे, काही उच्चपदस्त मोठ्या लोकांच्या फोटोखाली व्हिडीओमध्ये रीलमध्ये जे काही ऐकतो, पाहतो ते याच तंत्रज्ञानाच्या सहाय्याने केलेले असते. अनेकदा अशा लोकांना समाजात बदनाम करण्यासाठी, त्यांची प्रतिमा मलीन करण्यासाठी समाज माध्यमातून असे चुकीचे व्हिडीओ, ऑडिओ, रील्स व्हायरल केले जातात. सर्वसामान्य जनतेला यातील खरे- खोटे समजणे सहजासहजी शक्य होत नाही. याचा परिणाम समाजात तेढ निर्माण करणे, राजकीय समीकरण बदलणे, कोणत्याही संवेदनशील विषयाला वेगळे वळण देणे यावर होताना दिसतो. हे बनावट कंटेंट इतके खरे वाटतात, की ते मूळ आहेत की बनावट, हे ओळखणे कोणत्याही सामान्य माणसाला जवळजवळ अशक्य होते.

एआय आणि डीपफेक आधारित प्रमुख गुन्हे याचा अभ्यास केला असता, समजते की एआय आणि डीपफेक तंत्रज्ञानाचा वापर अनेक प्रकारच्या गुन्हेगारी कृत्यांसाठी केला जात आहे. त्यातील प्रमुख प्रकार म्हणजेच तोतयागिरी आणि आर्थिक फसवणूक हा होय. गुन्हेगार एआय निर्मित आवाज किंवा व्हिडीओ वापरून पीडितांच्या मित्र, कुटुंबातील सदस्य, किंवा उच्च अधिकाऱ्याची नक्कल करतात. बनावट आणीबाणी किंवा महत्त्वाच्या वायर ट्रान्सफरची मागणी करून लोकांची आर्थिक फसवणूक करतात. चेहरा किंवा आवाज ओळखण्यावर आधारित सुरक्षा प्रोटोकॉल भेदण्यासाठी डीपफेकचा वापर करून बँक खाती हॅक करणे, कर्ज घेणे किंवा क्रेडिट कार्ड उघडणे शक्य होते. खंडणी आणि ब्लॅकमेल करण्यासाठी सुद्धा गुन्हेगार याचा आधार घेतात. गुन्हेगार एखाद्या व्यक्तीचे बनावट, तडजोड करणारे किंवा आक्षेपार्ह व्हिडीओ/फोटो तयार करतात. या बनावट कंटेंटचा वापर करून पीडितांना ब्लॅकमेल केले जाते आणि त्यांच्याकडून पैसे उकळले जातात किंवा त्यांना त्यांच्या इच्छेविरुद्ध काम करण्यास भाग पाडले जाते. चुकीची आणि खोटी माहिती पसरवणे राजकीय नेते किंवा सार्वजनिक व्यक्ती असे काहीतरी बोलत किंवा करतानाचे डीपफेक व्हिडीओ तयार केले जातात, जे त्यांनी प्रत्यक्षात कधीच केले नसते. याचा उपयोग प्रतिष्ठेला हानी पोहोचवण्यासाठी, सामाजिक संघर्ष निर्माण करण्यासाठी किंवा निवडणुकांमध्ये गैरसमज पसरवण्यासाठी केला जातो. ओळख चोरी आणि फेक प्रोफाईल्स लोकांचे ऑनलाइन उपलब्ध असलेले फोटो वापरून –ख आणि डीपफेकच्या मदतीने त्यांचे फेक प्रोफाईल्स तयार करणे. या प्रोफाईलचा वापर इतरांची फसवणूक किंवा गैरवर्तन करण्यासाठी केला जातो.या धोक्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे? हे जाणून घेणे आजमितीला खूप आवश्यक आहे. एआय आधारित गुन्ह्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने काही गोष्टींची काळजी घेणे आवश्यक आहे.सत्यापनावर भर द्या : फोनवर किंवा व्हिडीओ कॉलवर एखाद्या ओळखीच्या व्यक्तीने पैशांची मागणी केल्यास, ताबडतोब शंका घ्या. त्यांच्याशी खाजगीरीत्या संपर्क साधून स्वतंत्रपणे माहितीची सत्यता तपासा. डीपफेक व्हिडीओंमध्ये काही विसंगती असतात, जसे की चेहऱ्यावरील हावभाव, डोळ्यांची हालचाल, प्रकाशाची दिशा किंवा आवाजाची गुणवत्ता. अशा बारीक गोष्टींकडे लक्ष द्या.

वैयक्तिक माहिती सुरक्षित ठेवा : सोशल मीडियावर तुमचे खूप जास्त वैयक्तिक फोटो किंवा व्हिडीओ पोस्ट करणे टाळा. गुन्हेगार याच डेटाचा वापर डीपफेक तयार करण्यासाठी करतात. तुमचे पासवर्ड मजबूत ठेवा आणि शक्य असल्यास टू–फॅक्टर ऑथेंटिकेशन वापरा.

स्थानिक कलाकारांसाठी व्यासपीठ

एआय जनरेटेड कंटेंट ओळखा : केंद्र सरकारने निर्देश दिले आहेत, की एआयच्या मदतीने तयार केलेल्या कोणत्याही कंटेंटसोबत (व्हिडीओ, ऑडिओ, फोटो) तो 'एआय जनरेटेड' असा उल्लेख करणे आवश्यक आहे. अशा सूचना असलेल्या कंटेंटवर लगेच विश्वास ठेवू नका.

जागरूक रहा : डीपफेक आणि सायबर गुन्ह्यांच्या नवीन पद्धतींबद्दल माहिती ठेवा.आपल्यासोबत असा कोणताही गुन्हा झाल्यास काय कराल? हे लक्षात ठेवा. ताबडतोब तक्रार करणे महत्त्वाचे आहे. सायबर गुन्ह्याची माहिती मिळाल्यास त्वरित राष्ट्रीय सायबर गुन्हे नोंदणी पोर्टलवर ऑनलाइन तक्रार नोंदवा. यासाठी संपर्क क्रमांक मदतीसाठी १९३० या सायबर हेल्पलाइन क्रमांकावर कॉल करा. एआय तंत्रज्ञान एक शक्तिशाली साधन आहे; परंतु त्याचा गैरवापर रोखणे आवश्यक आहे. व्यक्तिगत स्तरावर जागरूकता आणि सतर्कता बाळगणे, तसेच कायदेशीर आणि तंत्रज्ञानाच्या स्तरावर कडक नियमावली तयार करणे, हेच डीपफेक आणि एआय आधारित गुन्ह्यांचा वाढता धोका कमी करण्यासाठी महत्त्वाचे पाऊल आहे.

# जिद्दीला सलाम! दोन्ही हात अपूर्ण असतांनाही मालेगावच्या विनोद पगार यांनी मिळवले शिक्षकपद; शेकडो विद्यार्थ्यांचे बनले 'प्रेरणास्त्रोत'

## शरीर अपूर्ण असलं तरी मन अपराजित असेल, तर कोणतीही गोष्ट अशक्य नाही, या वाक्याचे मूर्तिमंत उदाहरण

दैनिक वादळ वार्ता
**दिपक गोसावी**

नमस्कार! महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यातील विराणे गावचे सुपुत्र विनोद भिकनराव पगार यांचा जीवनप्रवास म्हणजे शारीरिक मर्यादांवर अखंड जिद्द आणि दुर्दम्य इच्छाशक्तीने मिळवलेला विजय आहे. दोन्ही हातांनी अपंग असतानाही, त्यांनी आपल्या आयुष्यात हार मानली नाही; उलट आपल्या या कमतरतेलाच सर्वात मोठी शक्ती बनवली. आज ते तळोदा येथील शेठ के. डी. हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षक म्हणून कार्यरत आहेत आणि त्यांच्या प्रेरणेने शेकडो विद्यार्थ्यांचे आयुष्य बदलत आहे.

विनोद पगार यांचे बालपण अडचणींनी भरलेले होते. दोन्ही हातांनी अपंग असल्याने रोजच्या शालेय कामांपासून ते साध्या खेळांपर्यंत प्रत्येक गोष्टीत त्यांना संघर्ष करावा लागला. अनेकदा लोकांना त्यांच्या शारीरिक स्थितीवरून चेष्टा करतानाचा अनुभवही आला.

मात्र, याच वेळी त्यांच्या आयुष्यात देवदूतांसारखी माणसे उभी राहिली. त्यांचे वडील भिकनराव पगार, आई मंगलबाई पगार, काका नानाजी पगार आणि मावशी संगिता पगार यांनी कधीही त्यांच्या अपंगत्वाकडे दुर्लक्ष केले नाही. त्यांनी नेहमी प्रेरणा दिली की, तू हे करू शकतोस! कुटुंबाचा हा खंबीर आधारच त्यांची सर्वात मोठी ताकद बनला.

कुटुंबाच्या पाठिंब्याच्या बळावर विनोद पगार यांनी शिक्षणाची अखंड साधना सुरू ठेवली.

प्राथमिक शिक्षण वडनेर येथील आश्रम शाळेत पूर्ण केले.

माध्यमिक शिक्षण सरस्वती माध्यमिक विद्यालय, वडनेर येथे, तर उच्च माध्यमिक शिक्षण विराणे



येथील ज्युनिअर कॉलेजमधून घेतले.

नामपूर महाविद्यालयातून बीए पूर्ण केले आणि बीएड पदवी शिक्षणशास्त्र महाविद्यालय, गरताड येथून यशस्वीरित्या संपादन केली.

या प्रवासात त्यांनी अपंगत्वाची कधीही तक्रार केली नाही, तर तेच बळ बनवून आपले ध्येय गाठले. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांना शिक्षक बनण्याची संधी मिळाली. त्यांचे प्रेरणास्रोत आणि मार्गदर्शक मामा रवींद्र बेडसे व आत्या बायजाबाई बेडसे, तसेच पीई सोसायटी, तळोदा अध्यक्ष लक्ष्मण माळी, कॉलेज ट्रस्ट, तळोदा तळोदाचे अध्यक्ष भरत माळी यांच्या आशीर्वादाने ते शेठ केडी हायस्कूल, तळोदा येथे ते शिक्षक पदावर रुजू झाले. त्यांच्या मते, शिक्षकी पेशा ही केवळ नोकरी नसून, समाज घडवण्याचं एक व्रत आहे.

विनोद पगार यांच्यासाठी यशाची व्याख्या खूप वेगळी आहे. जेव्हा एखादा विद्यार्थी म्हणतो, 'सर, तुमच्याकडून आम्हाला जगण्याची प्रेरणा मिळते,' तेव्हा मला वाटतं की माझ्या आयुष्याचं सार्थक झालं, असे ते विनम्रपणे सांगतात. अपंगत्व असूनही शेकडो विद्यार्थ्यांना शिकवून त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.

त्यांचे संपूर्ण जीवन आई-वडील आणि नातेवाईक यांच्या प्रेरणेचे प्रतीक आहे, ज्यांनी त्यांना शिकवले की, परिस्थिती काहीही असो, प्रयत्न थांबवू नयेत. आपल्या यशोगाथेच्या माध्यमातून ते तरुणाईला एक महत्त्वाचा संदेश देतात: अडचणी तुमचं यश थांबवू शकत नाहीत, जोपर्यंत तुम्ही स्वतः थांबत नाहीत. आयुष्यात फक्त जिद्द, चिकाटी आणि सकारात्मक विचार ठेवा.विनोद पगार यांची कहाणी हे सिद्ध करते की, कोणत्याही प्रकारची शारीरिक कमतरता तुमच्या स्वप्नांना आणि ध्येयांना बांधून ठेवू शकत नाही. त्यांच्या संघर्षाला आणि यशोगाथेला सर्वत्र सलाम!


# माथाचापडी येथे 'अन्न हेच औषध' उपक्रमांतर्गत रानभाजी कार्यक्रम संपन्न

## कार्यक्रमात ४६ महिलांचा सक्रिय सहभाग

दैनिक वादळ वार्ता
**रविंद्र वळवी । मोलगी**

ग्रुप ग्रामपंचायत कुकडीपादर अंतर्गत येणाऱ्या माथाचापडी गावात 'अन्न हेच औषध' या महत्त्वपूर्ण उपक्रमांतर्गत रानभाजी कार्यक्रम दिनांक १४ रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. रानभाज्यांचे आरोग्यदायी महत्त्व गावकऱ्यांपर्यंत पोहोचवणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

सावित्रीबाई फुले एकात्म महिला समाज मंडळ, छत्रपती संभाजीनगर आणि एकलव्य ग्रामीण आदिवासी विकास मंडळ, कंजाला यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाला गावकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



कार्यक्रमात गावातील ४६ महिलांनी सक्रिय सहभाग नोंदवला आणि एकत्रितपणे २०४ रानभाज्या गोळा केल्या. या भाज्या स्थानिक पातळीवर सहज उपलब्ध असलेल्या आणि उच्च पोषणमूल्य असलेल्या होत्या. उपस्थित महिलांना रानभाज्यांचे पोषणमूल्य, आरोग्यदायी आहारातील त्यांचे स्थान आणि शरीराला होणारे फायदे याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. संस्थेच्या कार्यकर्त्यांनी महिलांना स्थानिक रानभाज्यांची योग्य ओळख कशी करावी, त्या कशा स्वच्छ कराव्यात, पाककृती आणि आहारातील त्यांचे महत्त्व याबद्दल तपशीलवार माहिती दिली. यावेळी रायसिंग वळवी, राजेंद्र वळवी, भरत वसावे, सरदार वळवी, दिलवरसिंग नाईक, सुरपसिंग वसावे, वसंत वसावे, मोहित वसावे व विनायक वळवी यांसह संस्थेचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते. गावकऱ्यांनी या उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले.

# नसरीन बागवान यांची राष्ट्रवादी महिला काँग्रेस शरदचंद्र पवार गट बीड जिल्हाध्यक्षा पदी नियुक्ती

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी महिला काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या बीड जिल्हाध्यक्षा पदावर नसरीन बागवान यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीचे पत्र राष्ट्रीय अध्यक्ष मा.खा. शरदचंद्रजी पवार साहेब,महिलांच्या राष्ट्रीय अध्यक्षा फौजीयाताई खान, तसेच खासदार बजरंग बाप्पा सोनवणे मा. ना. जितेंद्र आवड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या नियुक्तीद्वारे पक्षाच्या संघटनात्मक कामकाजाला गती मिळणार असून, बागवान यांनी पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. राष्ट्रीय अध्यक्ष मा.खा. शरदचंद्रजी पवार साहेब, राष्ट्रीय कार्याध्यक्षा व महासंसदरत्न खा. सुप्रियाताई सुळे, महिलांच्या राष्ट्रीय अध्यक्षा फौजीयाताई खान,मा.आ. जयंतराव पाटील साहेब तसेच प्रदेशाध्यक्ष मा.आ. शशिकांत शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पक्षाला



नवचैतन्य मिळावे या हेतूने त्यांनी काम करण्याची तयारी दर्शवली. पक्षाची ध्येय-धोरणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी व पक्ष बळकटीसाठी आपले पूर्ण सहकार्य राहील, असा विश्वास नव्याने नियुक्त झालेल्या जिल्हाध्यक्षा नसरीन बागवान यांनी व्यक्त केला. त्यांच्या नियुक्तीबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# सापडलेली सोन्याची अंगठी परत करून कृतीतून रुजवले प्रामाणिकतेचे मूल्यवर्धन



दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या महत्वाकांक्षी मूल्यवर्धन प्रशिक्षण ३.० च्या माध्यमातून अनेक मुलभूत व नैतिक मूल्ये विद्यार्थ्यांमध्ये रुजवावीत या हेतूने शिक्षकांचे प्रशिक्षण सध्या शहरात आनंदधाम परिसरातील एन. एम.सथा फार्मसी कॉलेज येथे पार पडले.या प्रशिक्षण व कॉलेज परिसरात भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचे अध्यापक व अहिल्यानगर महानगरपालिकेचे पर्यावरण दूत सतिश गुगळे यांना किमान ४ ते ५ ग्रॅम सोन्याची अंगठी सापडली.सतिश गुगळे सरांनी प्रामाणिकपणे ही बाब सुलभक श्री. गोरे सर यांना कळविली व प्रशिक्षण वर्गात एक वस्तू सापडली असून ज्याची असेल त्यांनी ओळख पटवून घेऊन जावे असे जाहीर करताच सदर प्रशिक्षणात सहभागी असणाऱ्या मार्कंडेय विद्यालय श्रमिकनगरच्या महिला अध्यापिका श्रीमती जयश्री चिंतल यांनी माझी सोन्याची अंगठी हरवल्याचे सांगितले.

वस्तूची ओळख पटल्याने सदर अंगठी सुलभक सौ. जोशी मॅडम व कोकाटे मॅडम यांच्या हस्ते शिक्षिका यांना सुपूर्द करताना त्यांच्या चेहऱ्यावरील विलक्षण आनंद पाहायला मिळाला.

प्रशिक्षणा दरम्यान आत्मसात केलेली अनेक मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रुजविताना किमान ४० ते ५० हजार रु. किमतीची ही सोन्याची अंगठी परत करून प्रामाणिकपणाचे एक कृतीयुक्त आदर्श उदाहरण सतिश गुगळे यांनी दाखवून दिल्याने त्यांचा अहिल्यानगर म.न.पा प्रशिक्षण समन्वयक अरुण पालवे यांच्या शुभहस्ते सर्व अध्यापकांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी मनपा समन्वयक अरुण पालवे व अध्यक्ष तुळशीराम लबडे महाराज यांनी आपल्या मनोगतात सतिश गुगळे सरांचे भरभरून कौतुक केले.

सतिश गुगळे यांच्या या प्रामाणिकपणा बद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

# श्रृती मनवेलीकर यांनी स्विकारली सावलीतील एका अनाथ मुलीच्या शिक्षणाची जबाबदारी

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

अनाथ मुलीच्या डोळ्यांत भविष्याची स्वप्नं होती, पण त्या स्वप्नांना उभारी देण्यासाठी प्रयास व नम्रता दादी-नानी ग्रुपच्या माध्यमातून श्रृती विक्रांत मनवेलीकर यांनी तिचे शैक्षणिक पालकत्व स्विकारले. केडगाव येथील सावली संस्थेत राहणाऱ्या या मुलीच्या संपूर्ण शालेय शिक्षण तसेच उच्च शिक्षणाचा खर्च उचलण्याची जबाबदारी घेतली आहे. पालकत्व स्विकारताना या निराधार मुलीच्या डोळ्यांत आशेचे भाव दाटून आले.

या प्रसंगी मुलीला आवश्यक शैक्षणिक साहित्य व भेटवस्तू देऊन प्रेमपूर्वक तिचे अभिनंदन करण्यात आले. कार्यक्रमाला प्रयास ग्रुपच्या संस्थापक अध्यक्षा अलकाताई मुंदडा, श्रृती मनवेलीकर, ड. रवींद्र शितोळे, सावली संस्थेचे नितेश बनसोडे, राजश्री शितोळे, सल्लागार विद्या बडवे, सचिव उज्वला बोगावत, खजिनदार मेघना मुनोत, लीला अग्रवाल, वैशाली देशपांडे, सारिका सौंदणकर, लावण्या रायपेल्ली, प्रीती चिंचणे, सारिका




चक्रनारायण, प्रतीक्षा जगताप, वर्षा मारवाडी, चिन्मयी राऊत आदींसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रृती मनवेलीकर म्हणाल्या की, निराधार मुलांना केवळ छप्पर आणि अन्न नव्हे, तर माया, प्रेम, आधार आणि स्वप्नांना हातभार देणे गरजेचे आहे. आज मुली प्रत्येक क्षेत्रात चमकत आहेत. क्रिकेट विश्वचषक जिंकण्यापासून ते विज्ञान, कला, शिक्षणापर्यंत मुलींनी आपली ओळख निर्माण केली आहे. या मुलींनाही तितकाच आत्मविश्वास आणि संधी मिळायला हवी. म्हणूनच मी या मुलीचे शैक्षणिक पालकत्व घेतले आहे. हा केवळ उपक्रम नाही, तर एक चळवळ आहे. 'प्रत्येक अनाथ लेकरू आमचे आहे' ही भावना पुढे न्यायची आहे. समाजातील प्रत्येकाने किमान एका मुला-मुलीचे पालकत्व घेतल्यास ही चळवळ यशस्वी होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सावली संस्थेचे प्रमुख नितेश बनसोडे म्हणाले की, आज मनवेलीकर कुटुंबाने एका मुलीचा हात धरला नाही, तर तिच्या भविष्याला दिशा दिली आहे. 'शैक्षणिक पालकत्व' ही योजना यापुढे अधिक व्यापक होणार असून, प्रयास ग्रुपच्या माध्यमातून महिला सदस्या उर्वरित ३० मुला-मुलींचेही पालकत्व घेतले जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली. तर समाजातील दुर्बल घटकांना आधार देण्याचे जे कार्य ग्रुपमधील सर्व महिला करत असल्याचे कौतुक केले.

विद्या बडवे म्हणाल्या की, सावली संस्थेचे बनसोडे कुटुंब जे कार्य करते ते म्हणजे खऱ्या अर्थाने मायेची सावली देण्याचे कार्य आहे. त्या अनाथ मुलांवर प्रेमाने, संयमाने आणि जबाबदारीने संस्कार करत आहेत. याच कार्याला हातभार लावण्यासाठी मनवेलीकर कुटुंब पुढे आले आहे. श्रृती मनवेलीकर या सुशिक्षित, सामाजिक मूल्य जपणाऱ्या महिला आहेत. त्यांनी घेतलेले हे पाऊल अनेकांसाठी आदर्श निर्माण करणारे असून, त्या आपल्या कुटुंबाचा सामाजिक वारसा पुढे घेऊन जात असल्याचे त्यांनी सांगितले.श्रृती मनवेलीकर या सुरभी ब्युटी पार्लर अँड अकॅडमीच्या संचालिका असून, त्यांनी स्वतःच्या अकॅडमीमार्फत शेकडो महिलांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देऊन आत्मनिर्भर केले आहे. अनेक महिलांना त्यांनी पार्लर व्यवसायात उभे केले, रोजगार निर्माण केला आणि 'महिला सक्षमीकरण' ही संकल्पना प्रत्यक्ष कृतीत उतरवली आहे. आज त्यांनी एका निराधार मुलीचे शैक्षणिक पालकत्व घेऊन आदर्श निर्माण केल्याबद्दल प्रयास व नम्रता दादी-नानी ग्रुपच्या महिलांनी त्यांचे विशेष अभिनंदन केले

# भारतीय बौद्ध महासभा अहिल्यानगर शहर शाखेतर्फे समता सैनिक दल प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता । अहिल्यानगर । प्रतिनिधी

दि. बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया भारतीय बौद्ध महासभा, अहिल्यानगर शहर शाखेतर्फे व जिल्हा दक्षिण विभाग यांच्या वतीने आयोजित समता सैनिक दल प्रशिक्षण शिबिर १५ ते १६ नोव्हेंबर दरम्यान भिंगार येथील सिद्धार्थ बुद्ध विहार येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. शिबिराचे उद्घाटन भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष आयुष्यमान राजेंद्र साळवे, जिल्हा संरक्षण उपाध्यक्ष संतोष गायकवाड, सचिव गोरख केदारे, तालुका अध्यक्ष नितीन साळवे तसेच शहर शाखेचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत शहराध्यक्ष दिपक पाटोळे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.

या दोन दिवसीय प्रशिक्षणासाठी मेजर जनरल हिरामण अहिरे यांनी प्रशिक्षक म्हणून कार्यभार सांभाळला. त्यांनी शिस्त, संघटन, सामाजिक बांधिलकी आणि दलाची भूमिका याबाबत शिबिरार्थींना प्रभावी मार्गदर्शन केले. एकूण २४ शिबिरार्थींनी प्रशिक्षण पूर्ण करून समता सैनिक दलाचा गौरवशाली मान मिळवला.

शिबिर यशस्वी करण्यासाठी जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे, संस्कार उपाध्यक्ष भगवंतराव गायकवाड, संरक्षण उपाध्यक्ष संतोष गायकवाड, सचिव किशोर कांबळे, शहर संस्कार उपाध्यक्ष बौद्धाचार्य लक्ष्मण माघाडे, विजय तात्या कांबळे, रवींद्र कांबळे, माधवराव चाबुकस्वार, सुरेश पानपाटील, प्रवीण ओरे, युवा नेते प्रतीक बारसे तसेच भिंगार सदर बाजार विहार पंच कमिटी व स्थानिक नागरिकांचे सहकार्य लाभले.

शहराध्यक्ष दिपक पाटोळे म्हणाले, बहुजन समाजावर होणाऱ्या अत्याचारांविरुद्ध लढण्यासाठी, संविधानाचे रक्षण करण्यासाठी व आंबेडकरी विचार जपण्यासाठी समता सैनिकदलाची आजची गरज अधिक आहे. तर जिल्हाध्यक्ष राजेंद्र साळवे यांनी सांगितले की, महाराष्ट्रात समता सैनिक दल कमांडर भिमराव यशवंतराव आंबेडकर यांच्या आदेशानुसार दोन लाख सैनिक घडवण्याचे उद्दिष्ट आहे. त्याच ध्येयातून अहिल्यानगरमध्ये हे प्रशिक्षण शिबिर आयोजित केले आहे.प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या समता सैनिकांमध्ये – विजय लक्ष्मण पाटोळे, विजय चाबुकस्वार, सुरेश पानपाटील, विनोद मिरपगार, प्रतीक ठोकळ, नित्यानंद कांबळे, राजेंद्र पाडळे, लक्ष्मण माघाडे, रामदास खरात, बापूराव भिंगारदिवे, संदेश भोसले, चंद्रकांत सरोदे, शशिकांत घोडके, नरेश खडसे, विजय कांबळे, संतोष जाधव, संजय डहाणे, युवराज बनसोड, अनिल जाधव, सनी माघाडे, गौतम पाचारणे, विशाल पवार, बापू कांबळे, प्रवीण ओरे यांचा समावेश आहे.

शहराध्यक्ष दिपक पाटोळे यांनी सर्व नव्या सैनिकांचे अभिनंदन करून पुढील सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाची सांगता 'सरनेते गाथा' म्हणून करण्यात आली.



# हिपरगां जानेराव येथील सभागृहाचा लोकार्पण सोहळा आमदार राजेश पवार; पूनमताई पवार यांच्या हस्ते संपन्न

## बरबडा सर्कलमध्ये पुनम ताई पवार यांच्या जि प तिकीट मागणीला पक्षसृष्टी सकारात्मक-आमदार राजेश पवार

दैनिक वादळ वार्ता

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेडच्या नायगाव तालुक्यातील हिप्परगा जानेराव येथील सिध्देश्वर मंदीर परिसरातील सभागृहाचा लोकार्पण सोहळा आज दिनांक, दि. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी आमदार राजेश पवार आणि जिल्हा सरचिटणीस सौ. पुनमताई पवार यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडला कार्यक्रमाची सुरुवात सिद्धेश्वर मंदिराची पूजा आरती विठ्ठल रुक्मिणीची पूजा आरती संत ज्ञानेश्वर महाराजांची पूजा आरती करून झाली संत ज्ञानेश्वर महाराज समाधी सोहळ्याच्य मुहूर्तावर लोकार्पण सोहळ्याचा आयोजन करण्यात आलं होतं यावेळी हिप्परगांव जाणेराव सह सोमठाणा गंगनबीड, रान सुगाव कुष्णूर, परिसरातील भाविक भक्त व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी बडबड सर्कलच्या भावी जिल्हा परिषद सदस्य म्हणून लोक चर्चेत असलेल्या पूनम ताई पवार यांच्या वतीने महिलाला साडी वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला व्यासपीठावर नायगाव विधानसभेचे आमदार राजेश पवार भाजपाच्या जिल्हा सरचिटणीस पूनम ताई पवार




मा . तालुकाध्यक्ष दत्ता पा ढगे, नायगांव तालुका भाजपा अध्यक्ष बालाजी मंदेवाड, दक्षिण तालुकाध्यक्ष श्रीहरी देशमुख नरंगलकर, मारोतराव ढगे व सध्या बडबडा सर्कलमध्ये लोक चर्चित असलेल्या भावी जिल्हा परिषद सदस्य म्हणून पुनम ताई पवार यांच्या नावाची जोरदार चर्चा होत आहे यावर आमदार राजेश पवार यांच्याशी सभासदांना ते म्हणाले प्रक्षेसृष्टीकडे अनेक आणि मागणी केली असून पुनम ताई पवार यांच्या जि प सदस्य टिकिट लोक मागणीला पक्ष सकारात्मक आहे असे ते म्हणाले, उपस्थित मा . तालुकाध्यक्ष दत्ता पा ढगे, तालुका अध्यक्ष श्रीहरी देशमुख, तालुका सरचिटणीस परमेश्वर पा जाधव, बालाजी मद्देवाड, प्रकाश हेंडगे, सोपान कदम, पत्रकार लक्ष्मण बर्गे, पत्रकार हानमंत चंदनकर, भगवान शेवाळे, व गावातील प्रतिष्ठित नागरिक व महीला मोठ्या संख्येने उपस्थित होते महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली सोमठाणा गावासह परिसरातील अनेक गावांची तहान भागविणारा आणि जवळपास ४५० ते ५०० एकर शेतीला पाण्याची सोय करून देणारा हा साठवण तलाव शेतकरी बांधवांसाठी वरदान ठरणार आहे.

हा प्रकल्प मंजूर होण्यासाठी १९९९ सालापासून सतत पाठपुरावा सुरू होता. विविध लोकप्रतिनिधी, पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी मोठे प्रयत्न करूनही काही अडचणी निर्माण होत होत्या. ग्रामस्थांच्या विनंतीनंतर आमदार राजेश पवार यांनी पुढाकार घेत हा विषय मार्गी लावला. भाजप-महायुती सरकारच्या माध्यमातून सुधारित प्रशासकीय मान्यता मिळवून देत या प्रकल्पाचे काम प्रत्यक्ष सुरू करण्यात आले. आज रोजी काम पूर्णत्वास जाऊन जलपूजनाचा ऐतिहासिक क्षण साक्षीला आला. प्रकल्पपूर्तीपेक्षा हे लोककल्याणकारी कार्य केल्याचा आनंद आणि समाधान मिळत असल्याची भावना आमदार राजेश पवार यांनी व्यक्त केली. पुढील काळातही मतदारसंघातील सिंचन वाढीसाठी प्रयत्न सुरू राहतील, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास मातोश्री श्रीमती लोक्याबाई संभाजी पवार, हिपरगा जानेराव येथील नारायण माणिक का कदम व्यंकटी पाटील कदम माधवराव शामराव कदम येसाजी देवराव कदम भगवान किशन कदम नंदकिशोर यादवराव कदम यंकटी माधव व्यंकटी कदम हनुमंत नागोराव भोसले गंगाधर देविदास कदम देवराव सुधाकर कदम यासह , महिला, युवा, शेतकरी तसेच भाजप-महायुतीतील पदाधिकारी-कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अण्णासाहेब साबळे यांना 'महाराष्ट्र भूषण' राज्यस्तरीय सन्मान




दैनिक वादळ वार्ता

**आष्टी । रविंद्र ठाकूर**

आष्टीचे ज्येष्ठ आणि परखड पत्रकार अण्णासाहेब साबळे यांना 'महाराष्ट्र भूषण राज्यस्तरीय आदर्श पत्रकार दर्पणरत्न' हा मानाचा सन्मान वडूज (जि. सातारा) येथे आयोजित भव्य सोहळ्यात प्रदान करण्यात आला. डीएसपी न्यूज लाईव्हचे संस्थापक दत्तात्रय सयाजी फाळके यांच्या हस्ते हा सन्मान देण्यात आला असून, या गौरवामुळे आष्टीची पत्रकारिता राज्यभर उजळून उठली आहे.साबळे यांनी मागील १५ वर्षांत जनहितासाठी अथक लढा देत भ्रष्टाचार, गैरव्यवहार आणि सामाजिक अन्यायाविरोधात निर्भीड आवाज उठवला आहे. दिव्यांग, निराधार, गोरगरीब आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी केलेल्या त्यांच्या सातत्यपूर्ण कार्याची विशेष दखल घेऊन हा प्रतिष्ठित सन्मान जाहीर झाला.सन्मानानंतर आष्टीत पत्रकार बांधव, मान्यवर आणि नागरिकांनी फेटा, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देत त्यांचा सत्कार केला. सोशल मीडियावरूनही शुभेच्छांचा वर्षाव होत असून त्यांच्या कार्याचा गौरव करण्याची साऱ्यांनीच संधी साधली आहे.या सन्मानामुळे आष्टी तालुक्याच्या पत्रकारितेची परंपरा राज्यभर नव्या उंचीवर पोहोचल्याचे अभिप्रेत आहे.

# पेड न्यूजवर आयोगाचा 'कडक अंकुश'; मतदारांची दिशाभूल रोखण्यासाठी कठोर नियमावली लागू!

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

निवडणूक प्रक्रियेत प्रसारमाध्यमांचा गैरवापर टाळण्यासाठी आणि मतदारांची दिशाभूल रोखण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने 'पेड न्यूज'वर कठोर नियंत्रण आणले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक व पोटनिवडणुकांदरम्यान पेड न्यूज रोखण्यासाठी विस्तृत नियमावली, कसोट्या आणि 'जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व माध्यम सनियंत्रण समिती' कार्यान्वित केल्याची माहिती समितीच्या अध्यक्षा डॉ. मित्ताली सेठी यांनी दिली आहे.

बातमीच्या स्वरूपात पैसे देऊन छापली जाणारी जाहिरात म्हणजेच 'पेड न्यूज'. अशा बातम्या मतदारांना प्रभावित करून

**प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने माध्यमांना निवडणुकांदरम्यान वस्तुनिष्ठता, निष्पक्षता आणि जबाबदारी राखण्याचे निर्देश दिले आहेत. धर्म, जात, भाषा किंवा वंशाच्या आधारावर शत्रुत्व वाढवणारी बातमी प्रसिद्ध न करण्याचा इशारा देण्यात आला आहे. तसेच, उमेदवारांचे वैयक्तिक अप्रमाणित आरोप आणि सरकारी निधीतून आलेल्या सत्ताधारी पक्षाच्या कामगिरीसंदर्भातील जाहिराती स्वीकारण्यास माध्यमांना स्पष्ट मनाई करण्यात आली आहे.**

निवडणुकीतील समसमान संधीचा भंग करतात. पेड न्यूजचा खर्च संबंधित उमेदवाराच्या निवडणूक खर्चात जोडला जाईल, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. आयोगाने पेड न्यूज ओळखण्यासाठी काही महत्त्वपूर्ण मार्गदर्शक तत्त्वे निश्चित केली आहेत त्यामध्ये विविध माध्यमांत लेखकाचे नाव नसलेले, पण मजकूर आणि छायाचित्रे तंतोतंत जुळणारे वृत्तांत, विशिष्ट उमेदवाराला 'सर्व समाजाचा पाठिंबा' असल्याचे किंवा किरकोळ घटनांना मोठा प्रचार म्हणून रंगवणारे दावे. एका पक्षाच्या सभांना अवाजवी प्रसिद्धी देणे आणि प्रतिस्पर्ध्याला प्रसिद्धी न देणे.

निवडणूक जाहीर झाल्यानंतर समितीने पेड न्यूजसंदर्भात कामकाजाची माहिती प्रसारमाध्यमांना दिली आहे. तक्रार आल्यास समिती तत्काळ चौकशी करेल आणि ३ दिवसांत संबंधित पक्ष, उमेदवार आणि माध्यमांना नोटीस देईल. पेड न्यूज सिद्ध झाल्यास, वृत्तपत्राच्या जाहिरात दरांनुसार तो खर्च उमेदवाराच्या निवडणूक खर्चात जमा केला जाईल. जिल्हा समितीच्या निर्णयावर समाधान न झाल्यास, उमेदवार किंवा पक्ष ३ दिवसांच्या आत राज्यस्तरीय समितीकडे अपील करू शकतात. राज्यस्तरीय समितीचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक असेल.जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी स्पष्ट केले की, पेड न्यूज रोखण्यासाठी ही सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्त्वे लोकशाहीतील स्वच्छ आणि पारदर्शक निवडणूक प्रक्रियेसाठी अत्यंत महत्त्वाची आहेत.

# तळोदा तालुक्यात 'आरोग्य दूत' आमदार राजेश पाडवींच्या प्रयत्नातून ३०० हून अधिक जेष्ठ नागरिकांची तपासणी; लवकरच साहित्य वाटप

## केंद्र सरकारच्या 'वयोश्री' व 'दिव्याशा' योजनांचा लाभ थेट नागरिकांपर्यंत

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

आरोग्य दूत म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आमदार राजेश पाडवी यांच्या विशेष प्रयत्नातून तळोदा तालुक्यात केंद्र सरकारच्या जनकल्याणकारी योजनांतर्गत ६० वर्षे व त्यावरील जेष्ठ नागरिकांसाठी आणि महिलांसाठी भव्य आरोग्य तपासणी शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. १५ ते १८ नोव्हेंबर दरम्यान धानोरा, मोरवड, छोटाधनपूर आणि कढेल या चार गावांमध्ये झालेल्या या शिबिरात मुंबई व कानपूर येथील तज्ञ डॉक्टरांनी सेवा दिली.भारतीय जनता पक्षाचे तालुका सरचिटणीस तथा सामाजिक कार्यकर्ते शुभम चौधरी यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात जवळपास




३०० हून अधिक जेष्ठ नागरिक व महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली.राष्ट्रीय वयोश्री योजना आणि केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री दिव्याशा केंद्र यांच्या माध्यमातून तपासणी करण्यात आलेल्या गरजू लाभार्थ्यांना लवकरच आवश्यक त्या साहित्याचे वाटप करण्यात येणार आहे.

या शिबिराला जितेंद्र पाडवी, सरपंच दशरथ ठाकरे, प्रवीण वळवी, संजय वळवी व प्रमिला मवाशी आदी मान्यवरांनी उपस्थिती लावली. शिबिर यशस्वी करण्यासाठी जितेंद्र पाटील, सीताराम पाटील, भूषण पाटील, उमेश पाटील यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

## आ.धनंजय मुंडे यांनी पहिला धक्का

# माजी उपनगराध्यक्ष आयुब भाई पठाण यांचा उमेदवारी अर्ज बाद!

दैनिक वादळ वार्ता

**परळी । प्रतिनिधी**

परळी नगर परिषद निवडणूक अर्जाची करण्यात आली. दरम्यान आ.धनंजय मुंडे यांचे कट्टर समर्थक तसेच परळी नगरपरिषदेचे माजी सभापती आणि उपनगराध्यक्ष राहिलेले राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे अधिकृत उमेदवार आयुब भाई पठाण यांचा प्रभाग क्रमांक तीन मधून खोला महिला प्रवर्गातून ओबीसी मधून उमेदवारी अर्ज छाननी दरम्यान तीन अपत्य असल्याचे निदर्शनास आल्यानंतर निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अवैध ठरवण्यात आला आहे. यामुळे आमदार धनंजय मुंडे यांना पहिला धक्का असल्याचे बोलले जात आहे. कारण आयुब भाई पठाण हे धनंजय मुंडे यांचे कट्टर समर्थक समजले जातात तसेच त्यांची चर्चा परळी शहरात जनसेवक म्हणून असून



त्यांचा अर्ज बाद झाल्याने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार हा विजय असल्याचीही चर्चा आहे.

## नंदुरबारच्या भिल्ली,पावरी,मावची भाषा आता ए आय च्या माध्यमातून डिजिटल युगात!

# 'बोला, रेकॉर्ड करा आणि कमवा': आदिवासी भाषा संवर्धन प्रकल्पासाठी स्थानिक वक्त्यांना आवाहन

दैनिक वादळ वार्ता

**नंदुरबार । दिपक गोसावी**

महाराष्ट्र शासन आणि जिल्हा प्रशासन, नंदुरबार यांच्या संयुक्त विद्यमाने नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी भाषांच्या संवर्धनासाठी एक अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि ऐतिहासिक पाऊल उचलण्यात आले आहे. लँग्वेज एआय असिस्टंट प्रोजेक्ट या नावाने सुरू झालेल्या या उपक्रमांतर्गत भिल्ली, पावरी आणि मावची या स्थानिक आदिवासी भाषांमध्ये मराठी आणि हिंदी भाषेतील महत्त्वाची माहिती अनुवादित करण्यासाठी एक स्थानिक भाषा-आधारित ए आय सहाय्यक विकसित केला जात आहे.

हा प्रकल्प केवळ तांत्रिक नवोपक्रम नसून, आदिवासी भाषांचे डिजिटायझेशन करून त्यांचे भविष्य सुरक्षित करण्याच्या दृष्टीने उचललेले पाऊल आहे. या ए आय सहाय्यकामुळे सरकारी योजना आणि आवश्यक माहिती थेट आदिवासी नागरिकांपर्यंत त्यांच्या मातृभाषेत पोहोचवणे शक्य होणार आहे. या प्रकल्पासाठी भिल्ली, पावरी आणि मावची भाषेत सहज आणि प्रवाही बोलू शकणाऱ्या नंदुरबार जिल्ह्यातील तरुण-तरुणी, महिला-पुरुष यांना सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

इच्छुक सहभागींनी त्यांच्या स्थानिक भाषेत दिलेल्या स्क्रिप्ट वाचून मोबाईलवर त्यांचा आवाज रेकॉर्ड करायचा आहे. हा आवाज ए आय मॉडेलला प्रशिक्षित करण्यासाठी वापरला जाईल. या कामासाठी वक्त्यांना योग्य मानधन दिले जाणार आहे, ज्यामुळे 'बोला, रेकॉर्ड करा आणि कमवा' अशी रोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. जिल्हा प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, या उपक्रमामुळे स्थानिक भाषा जाणणाऱ्या युवकांना रोजगाराची संधी तर मिळेलच, पण त्याचबरोबर आदिवासी भाषा आणि संस्कृतीची सुंदर सांगड तंत्रज्ञानासोबत घातली जाईल. स्थानिक वक्त्यांचा आवाज नंदुरबारच्या आदिवासी भाषांना जागतिक डिजिटल नकाशावर स्थान मिळवून देण्यास मदत करेल.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077